स्थापना || श्री दत्त प्रसन्न || 1987

# दत्तसेवा

## सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

पश्चिम उपनगरातील अग्रेसर पतपेढी

रजि. नं. बी.ओ.एम./डब्ल्यू.पी./आर.एस.आर./(सी.आर.)/११०२/८७.

आपल्या **देशासाठी...**
आपल्या **नागरिकांसाठी...**
आपल्या **परिवारांसाठी...**
परिवारातल्या **प्रत्येकासाठी...**
आपल्या **मित्रजनांसाठी...**
आपल्या **प्रशासनासाठी...**

# कोरोना योध्दा

## सदैव तत्पर असणारे

**डॉक्टर्स, नर्स, पोलीस, सफाई कर्मचारी, मेडिकल स्टाफ, ॲम्ब्युलन्स ड्रायव्हर्स, शासकिय कर्मचारी, बँक कर्मचारी व सर्व कोरोना योध्दा यांना दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई परिवाराक**

# मानाचा मुजरा !



प्रधान कार्यालय :
1/136, बी.एम.सी. कॉलनी, मार्वे रोड,
मालवणी अग्निशमन केंद्रासमोर,
मालाड (पश्चिम), मुंबई-400 095.
फोन नं. : 2888 9027/8108160101/113
Website : www.dattaseva.com
Email : dattasevapatpedhi@gmail.com

## 33 वा वार्षिक अहवाल 2019-2020

# संचालक मंडळ



श्री. आनंदराव ई. माईंगडे
संस्थापक/अध्यक्ष



श्री. गोपीनाथ म. राणे
उपाध्यक्ष



श्री. विनय गो. जोशी
संचालक



श्री. जयवंत ग. पाटील
संचालक



श्री. प्रभाकर ज. धुरी
संचालक



श्री. प्रदिप नि. कदम
संचालक



श्री. अरविंद रा. कोळी
संचालक



श्री. भार्गवदास रा. जाधव
संचालक



श्री. वसंत कृ. पाटील
संचालक



श्रीम. शिवगामी उ. पिल्लई
संचालिका



सौ. स्नेहा शे. सुतार
संचालिका



ॲड. जयसिंग एस. सुर्यवंशी
तज्ञ संचालक



श्री. हरी के. पाटील
मुख्यव्यवस्थापक



सौ. अर्चना आ. माईंगडे
उप मुख्यव्यवस्थापक



श्री. नंदकुमार द. पाटील
मुख्य वसुली अधिकारी

# दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

## 33 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्या. मुंबई या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची 33 वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. 07/03/2021 रोजी सकाळी 10.30 वाजता श्री श्याम सत्संग भवन, महावीर नगर जवळ, एकता नगर, लिंक रोड, ब्लू आर्च बिल्डींग मागे, कांदिवली (प.), मुंबई - 400 067. येथे खालील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी बोलविण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.

## सभेपुढील विषय

1) दि. 11/08/2019 रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2) संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक 31 मार्च 2020 पर्यंतच्या कार्याचा अहवाल, ताळेबंद पत्रक व त्या सालाचे नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
3) सन 2019-20 या सालचा अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षक यांचा अहवाल वाचून स्विकृत करणे.
4) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
5) सन 2020-21 करिता अंतर्गत व कर लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
6) सन 2020-21 करिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
7) सन 2019-20 मधील अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देऊन त्यामधील ज्यादा खर्चास मान्यता देणे व सन 2020-21 सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
8) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
9) नवीन शाखा सुरु करण्याबाबत विचार विनीमय करणे.
10) शाखा दुरुस्ती बाबत चर्चा करणे.
11) संस्थेकरिता नवीन वाहन खरेदी करणेबाबत.
12) शाखा कार्यालयाकरिता जागा खरेदी बाबत चर्चा करणे.
13) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती त्यांनी विनंती केल्यानुसार क्षमापित करणे.
14) सन 2018-19 च्या लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
15) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
सही/-
श्री. हरी पाटील
मुख्यव्यवस्थापक

स्थळ : मालाड, मुंबई 400 095.
दिनांक : 18/02/2021

## विशेष सुचना

1. गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी वरील विषयांवर विचार करण्यासाठी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
2. ज्या सभासदांना ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकाबाबत लेखी सुचना करावयाच्या असल्यास सभेच्या चार दिवस अगोदर कार्यालयात आणून द्याव्यात. ऐनवेळी आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.
3. सभासदांनी आपल्या राहण्याच्या व कामाच्या पत्त्यातील बदलासंबंधी तसेच फोन नंबर संस्थेस त्वरीत कळवावे.
4. ज्या सभासदांनी भाग दाखले घेतले नसतील त्यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयातून कामकाजाच्या वेळेत घेऊन जावेत.
5. ज्या सभासदांनी 3 वर्षातील लाभांश घेतला नसेल तो त्वरीत घेऊन जावा. जर लाभांशाची रक्कम घेऊन न गेल्यास पोटनियमातील तरतूदीप्रमाणे लाभांश राखीव निधीमध्ये वर्ग केला जाईल.
6. कोरोनामुळे महानगरपालिकेच्या नियमानुसार संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असून सभासदांनी सभेच्या सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात येऊन सभेचा युजर आय. डी. व पासवर्ड घेऊन सभेमध्ये सहभागी व्हावे.

संचालक मंडळ

## अध्यक्षांचे
# मनोगत....

सन्माननीय सभासद बंधू भगिनी यांस सस्नेह नमस्कार.....

आपल्या संस्थेचा सन 2019-2020 चा 33 वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक संचालकांच्या वतीने आपणासमोर सादर करताना मला आनंद होत आहे.

सर्व सामान्य तळागाळातील लोकांना बचतीची सवय लागावी व त्यांचे आयुष्य सुसह्य करून त्यांना आर्थिकदृष्टया प्रबळ करण्याकरिता 27 जुलै 1987 साली मालवणी सारख्या मागासलेल्या विभागात दत्तसेवा सहकारी पतपेढीची स्थापना करण्यात आली.

संस्थेचा प्रवास गेली 33 वर्ष अविरत चालू आहे. संस्थेच्या आज 18 शाखा कार्यरत असून या शाखांवर प्रशासकिय कार्यालय व कर्ज वसुली विभागाद्वारे नियंत्रण केले जाते. संस्थेने 33 वर्षात केलेल्या प्रगतीमुळे आज पश्चिम उपनगरातील अग्रेसर पतपेढी म्हणून नावलौकिक आहे. संस्थेची प्रगती ही संस्थेचे संचालक, कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी यांच्या सहकार्याने झालेली आहे. संस्थेतील संचालक, अधिकारी, कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी यांना बँकींग क्षेत्रातील माहिती देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते त्याकरिता सुसज्ज असे प्रशिक्षण केंद्र, कर्ज वसुली विभाग कार्यालय, प्रधान कार्यालय मालाड (प.) येथे तयार केले आहे.

सहकार क्षेत्रासमोर असलेली नवी आव्हाने, मोठ्या प्रमाणातील स्पर्धा यामध्ये देखील संस्थेने आपली वाटचाल खंबीरपणे चालू ठेवली आहे. सभासदांना जलद व गुणवत्तापुर्वक सेवा देण्यासाठी सर्व शाखा कोअर बँकींग प्रणालीने जोडण्यात आलेल्या आहेत. यामुळे कोणत्याही शाखेतून व्यवहार करता येतात तसेच संस्थेचे सर्व व्यवहार दैनंदिन ठेव व इतर सर्व संकलनाचे काम मोबाईल ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने सुरु आहे. यामुळे सभासदांना त्यांचे दैनंदिन ठेवीचे व्यवहार मोबाईलवर पाहता येणे शक्य झाले आहे.

सभासदांचा व कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा विचार करून सभासद कल्याण निधी व कर्मचारी कल्याण निधी तयार केला असून त्या मार्फत सभासदांना व कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत केली जाते.

विविध आव्हाने, शासनाचे नियम व इतर अडचणींवर मात करत आर्थिक वर्षात संस्थेने 375 कोटी संमिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. संस्थेने सभासदांना सतत 10% लाभांश दिला आहे. तसेच सातत्याने ''अ'' ऑडीट वर्ग मिळवला आहे.

कोरोना महामारीमुळे अनेक व्यवसाय संकटात आले त्याचा फटका बँका व पतपेढ्यांनाही बसला. सुरूवातीस अतिशय बिकट अवस्था होती परंतु मोठ्या विश्वासाने सभासदांनी ठेवलेल्या ठेवी त्यांना संकटसमयी परत देणं मोठे आव्हान होते परंतु संस्थेचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी यांनी आपल्या कुटूंबाची काळजी घेऊन संस्थेच्या सर्व 18 शाखा सुरू ठेवल्या व सभासदांना सेवा दिली. एक सामाजिक बांधिलकी म्हणून महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार कोरोना ग्रस्तांसाठी 1,51,000/- चा धनादेश राज्याचे आरोग्यमंत्री मा. श्री. राजेश टोपे यांना सुपूर्द करण्यात आला तसेच लॉकडाऊन झाल्यामुळे अनेक सभासद, कामगार संकटात आले होते. त्यांच्या उदरनिर्वाहा करिता संस्थेच्या वतीने 155 सभासदांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्याचे तहसिलदार यांना कोरोना तपासणीकरिता 51,000/- ची पल्स मीटर व इतर वैद्यकिय उपकरणे घेण्याकरिता आर्थिक सहकार्य करण्यात आले तसेच संस्थेच्या सर्व शाखेत सभासद आल्यानंतर त्यांना सॅनिटायजर, पल्स मिटर व टेंपरेचर गन उपलब्ध करून देण्यात आले होते.

संस्थेच्या पारदर्शी कारभारामुळेच सभासदांचा विश्वास संपादन केला आहे तसेच उत्कृष्ठ कामकाज केल्यामुळे पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशन व बँको या संस्थेमार्फत संस्थेचा गौरव करण्यात आला आहे. सभासदांच्या आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित न राहता संस्थेने सामाजिक बांधिलकी म्हणून वृक्षारोपण, दत्तजयंती उत्सव, क्रिडा स्पर्धा, विद्यार्थी गुणगौरव, गरजू मुलांना वह्या वाटप असे विविध उपक्रम राबविण्यात आलेले आहेत.

आजपर्यंत संस्थेच्या प्रगतीकरिता संस्थेचे संचालक मंडळ, अधिकारी वर्ग, कर्मचारी वृंद व दैनंदिन प्रतिनिधी यांची मेहनत विसरून चालणार नाही त्यांच्या अहोरात्र मेहनतीमुळेच संस्थेची प्रगती झाल्याचे मी नम्रपणे नमुद करतो तसेच सभासदांनी दाखविलेला विश्वास व प्रेम असेच वृध्दींगत व्हावे हिच प्रभूचरणी प्रार्थना.

जय हिंद..! जय महाराष्ट्र...! जय सहकार...!

धन्यवाद !

**मा. श्री. आनंदराव माईंगडे**
संस्थापक / अध्यक्ष

## * अहवाल सालातील विशेष उल्लेखनीय कार्य *

**खेळते भागभांडवल :-**

संस्थेने सभासदांना दिलेली दर्जेदार सेवा, सभासदांशी जपलेला ऋणानुबंध आणि सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास यामुळे संस्थेने 31 मार्च 2020 अखेर 280 कोटी खेळते भागभांडवलाचा टप्पा पूर्ण केला आहे. तर 369 कोटी संमिश्र व्यवसाय पूर्तता केली आहे, ही बाब संस्थेच्या व आपणा सर्वांच्या दृष्टीने विशेष अभिनंदनीय आहे.

**स्वतःच्या मालकीची शाखा कार्यालये :-**

संस्थेचे प्रधान कार्यालय व 18 शाखा सभासदांच्या सेवेशी कार्यरत आहेत. त्यापैकी मालवणी, गोरेगांव(प.), गोराई(प.), जोगेश्वरी (प.), कांदिवली (प.), जोगेश्वरी (पू.), मालाड (पू.), नायगाव(प.), दहिसर(पु.), म्हाडा (मालवणी), भांडुप (प.), विरार (पू.), घाटकोपर, नालासोपारा (पु) या 14 शाखा संस्थेच्या स्वमालकीच्या असून त्याची किंमत आजच्या बाजारभावाप्रमाणे सुमारे 8 कोटीपेक्षा जास्त आहे.

**मान्यवरांच्या भेटी :-**

अहवाल सालात संस्थेच्या प्रधान कार्यालयाबरोबर शाखा कार्यालयांना सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांनी सदिच्छा भेटी दिल्या. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या कामकाजाची पाहणी करून माहिती घेतली त्याचप्रमाणे संस्थेच्या कामकाजाचे व प्रगतीचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले त्याबद्दल संस्था त्यांचे आभारी आहे.

**शिक्षण व प्रशिक्षण :-**

सहकार खात्याच्या नियमानुसार पतसंस्थेच्या संचालक व कर्मचारी यांनी 3 दिवस प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. यानुसार संस्थेने सन 2019–20 या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे सहभाग घेऊन सभासद, संचालक व कर्मचारी यांना 100% प्रशिक्षण दिले आहे.

1) दि. 18/01/2020 रोजी फेडरेशनच्या वतीने कांदिवली (प.) येथे सभासद प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमांस 31 कर्मचारी उपस्थित होते.
2) दि. 10/01/2020 ते दि. 11/01/2020 या कालावधीमध्ये कर्जत येथे प. उ. जि. फेडरेशन आयोजित कार्यक्रमास 8 संचालक उपस्थित होते.
3) दि. 30/11/2019 रोजी सावंतवाडी येथे मुंबई सहकारी बोर्ड आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये 4 कर्मचारी उपस्थित होते.
4) दि. 28/09/2020 रोजी कांदिवली येथे सहकार भारती फेडरेशनच्या वतीने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमास 9 संचालक व 38 कर्मचारी उपस्थित होते.
5) दि. 22/12/2019 रोजी तुरुकवाडी (कोल्हापुर) येथे सहकार मेळावा व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. त्यास इतर संस्थांचे व संस्थेचे मिळून एकूण 50 प्रतिनिधी उपस्थित होते.
6) दि. 01/06/2019 रोजी कांदिवली (प.) येथे मुंबई सहकारी बोर्डाच्यावतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमास संस्थेचे 650 सभासद उपस्थित होते.
7) संस्थेच्या प्रधान कार्यालयाशेजारी कर्ज वसुली विभाग असून त्यामध्ये सुसज्ज असे स्वमालकीचे प्रशिक्षण केंद्र आहे. संस्थेच्या अधिकाऱ्यांमार्फत कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी यांना नियमित प्रशिक्षण दिले जाते.

**सभासद :-**

मागील अहवाल वर्षाअखेर सभासद संख्या 47703 होती. अहवाल वर्षात 10629 नवीन सभासद झाले. त्यामधील 798 सभासदांनी अन्य कारणास्तव राजीनामे दिले. अहवाल वर्ष अखेरीस 57,534 कायम सभासद संस्थेच्या पटावर आहेत.

# दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

**भाग भांडवल :-**

आपल्या संस्थेचे अधिकृत भागभांडवल ₹ 20 कोटी असून मागील अहवाल वर्षाअखेर संस्थेची भागभांडवल रक्कम ₹ 11,56,45,730/- होती. अहवाल वर्षामध्ये नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून (कर्ज वाटपाच्या प्रमाणात) वसुल झाल्याने भाग रक्कम ₹ 1,82,91,080/- जमा झाली आहे. काही सभासद स्थलांतरित झाल्याने व राजीनामा दिल्याने ₹ 91,04,750/- चे भाग परत देण्यात आले. अहवाल वर्षाअखेर शिल्लक भागभांडवल ₹ 12,48,32,060/- आहे.

**राखीव व अन्य निधी :-**

अहवाल वर्षाच्या सुरूवातीला राखीव व अन्य निधी रक्कम ₹ 29,85,69,748.47 होता. अहवाल साली ₹ 4,04,21,220.40 इतक्या तरतूदी करण्यात आल्या असुन 31 मार्च 2020 अखेरीस एकूण ₹ 33,89,90,968.87 इतका निधी जमा आहे.

**गुंतवणूक :-**

अहवाल सालाच्या सुरुवातीस अतिरिक्त व राखीव निधी व तरलतेपोटी ₹ 69,10,61,324.50 विविध बँकेमध्ये गुंतवणूक केली होती. संस्थेच्या विविध ठेवीमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाढ व सहकार आयुक्तांनी लागू केलेले सी. डी. रेशोचे प्रमाण व तरलता गुंतवणूकीचे निकष विचारात घेऊन ठेवीदारांची रक्कम आवश्यकतेप्रमाणे ठेवीदारांना त्वरीत परत करता यावी या उद्देशाने अहवाल सालात संस्थेने एकूण ₹ 56,54,80,547.50 एवढी गुंतवणूक विविध बँकेत केलेली आहे.

**ऑडीट वर्ग :-**

संस्थेचे सन 2019-2020 या अहवाल वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण एस. बी. सणस ॲण्ड असोसिएट्स प्रमाणित लेखापरिक्षक यांनी केले. तसेच वैधानिक लेखा परिक्षण दिक्षीत दत्तात्रय ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौटंट यांनी केले असून संस्थेस वैधानिक लेखापरिक्षणाचा 'अ' वर्ग मिळाला आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण 21 सभा झाल्या. या सभांना सर्व संचालक जास्तीत जास्त संख्येने उपस्थित होते. प्रत्येक सभेत संस्थेचे हित व प्रगतीचा विचार करून सर्वानुमते निर्णय घेण्यात आले आहेत.

**कार्यक्षेत्र :-**

संस्थेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबई, ठाणे, सांगली, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, सिंधुदुर्ग, पालघर जिल्ह्यापुरते मर्यादित आहे.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब :-**

बँकींग क्षेत्रात सर्वत्र होत असलेला इंटरनेटचा वापर लक्षात घेता संस्थेने मोबाईलद्वारे डेली कलेक्शन करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात केली असून सर्व व्यवहाराची माहिती सभासद व ठेवीदारांना मोबाईलवर एस.एम.एस. द्वारे दिली जाते.

**कर्मचारी वर्ग :-**

संस्थेतील अंतर्गत कामकाजाची पूर्तता करण्याकरीता वरिष्ठ अधिकारी, विभागीय अधिकारी, शाखाधिकारी व वरिष्ठ लिपिक, वसुली अधिकारी, रोखपाल, लिपिक, शिपाई असे एकूण 101 कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार कामाची विभागणी करून जबाबदारी देण्यात आल्यामुळे संस्थेच्या अंतर्गत कामकाजाचा दर्जा उंचावला आहे.

**ठेव संकलन प्रतिनिधी :-**

संस्थेचा प्रचार हा दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधीद्वारे होत असतो व घरपोच सेवा देण्याचे काम ते करतात. अहवाल सालात संस्थेच्या विविध शाखेत 113 दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत. संस्थेच्या ठेवी वाढविण्यामध्ये व संस्थेच्या प्रगतीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे.

**संचालक व त्यांचे नातेवाईक कर्ज तपशिल :**

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 75 (2) नुसार 31 मार्च 2020 अखेर संचालक आणि त्यांच्या नातलगांच्या नांवे ₹ 1,25,07,175/- कर्ज शिल्लक आहे.

**कर्ज वसुली अधिकार :**

मा. अप्पर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संस्थेचे मुख्य वसुली अधिकारी श्री. नंदकुमार दत्तात्रय पाटील, शाखाधिकारी श्री. शशिकांत जयवंत पाटील, श्रीमती शोभा शामराव भोसले, श्री. कृष्णा रंगराव जाधव, श्री. जितेंद्र शामराव साळवी व वसुली अधिकारी श्री. महेश कृष्णा दळवी यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 156 व नियम 107 नुसार शासकीय वसुली अधिकाऱ्याचे अधिकार प्रदान केले आहेत. ज्या कर्जदारांवर कोर्ट कारवाई करून वसुली दाखला घेण्यात आलेला आहे. त्या सभासदांनी आपले थकीत कर्ज भरावे अन्यथा त्यांच्यावर जप्ती, पगारकपात इ. कायदेशीर कारवाई होऊ शकते. याबाबत आपल्या काही अडचणी असल्यास कार्यालयात हजर राहून अधिकारी अथवा संचालक मंडळा समोर समक्ष चर्चा करावी ही विनंती.

**सभासद ठेवी :**

संस्थेच्या प्रगतीची घोडदौड कायम ठेवण्यासाठी संस्था ठेवी वाढविण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवित असते. यामुळे अहवाल सालात ठेवीमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. संस्थेकडे मागील वर्षाअखेर विविध ठेव खात्यामध्ये रक्कम ₹ 186.70 कोटी शिल्लक होती. अहवाल वर्षात ₹283.94 कोटी ठेवी पोटी जमा झाले असून मुदत संपल्यानंतर सभासदांना ₹ 283.30 कोटी च्या ठेवी परत केल्या असून अहवाल वर्षाअखेर ₹ 187.34 कोटी ठेवी शिल्लक आहेत. गतवर्षाच्या तुलनेत मार्चमध्ये कोरोना या संसर्गजन्य साथीमुळे वर्षाअखेर ठेवी परत गेल्या आहेत त्यामुळे अहवाल सालात ठेवीमध्ये 0.34% वाढ झालेली आहे. त्याची तुलनात्मक आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

*** ठेव प्रगती तक्ता ***

(₹. कोटीत)

| अ. क्र. | ठेवीचा प्रकार | 31 मार्च 2019 अखेर शिल्लक जमा | अहवाल वर्षातील जमा | अहवाल वर्षातील परत दिलेली रक्कम | 31 मार्च 2020 अखेर शिल्लक | ठेवीमध्ये झालेली वाढ/घट% |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बचत ठेव | 8.01 | 131.27 | 134.16 | 5.12 | -36.08 |
| 2 | मुदत ठेव | 50.18 | 24.28 | 36.73 | 37.73 | -24.81 |
| 3 | दामदुप्पट ठेव | 16.07 | 4.32 | 5.02 | 15.37 | -4.36 |
| 4 | मासिक ठेवी | 1.09 | 1.13 | 1.25 | 0.97 | -11.01 |
| 5 | सक्तीची बचत ठेव | 1.75 | 0.56 | 0.25 | 2.06 | 17.71 |
| 6 | लखपती ठेव | 1.35 | 1.20 | 0.17 | 2.38 | 76.30 |
| 7 | त्रिमुर्ती दैनंदिन ठेव | 26.21 | 65.85 | 68.36 | 23.7 | -9.58 |
| 8 | दाम तिप्पट ठेव | 0.59 | 0.12 | 0.10 | 0.61 | 3.39 |
| 9 | मासिक लखपती ठेव | 1.43 | 1.53 | 1.52 | 1.44 | 0.70 |
| 10 | दाम चौपट ठेव | 5.13 | 1.40 | 0.25 | 6.28 | 22.42 |
| 11 | मासिक व्याज परतावा | 21.72 | 5.66 | 4.81 | 22.57 | 3.91 |
| 12 | दैनंदिन प्रतिनिधी ठेव | 1.68 | 0.40 | 0.18 | 1.90 | 13.10 |
| 13 | दिपलक्ष्मी ठेव | 24.72 | 17.39 | 12.39 | 29.72 | 20.23 |
| 14 | मंगलमुर्ती ठेव | 5.34 | 8.88 | 3.15 | 11.07 | 107.30 |
| 15 | महालक्ष्मी ठेव | 14.16 | 15.29 | 7.00 | 22.45 | 58.55 |
| 16 | वसंतपंचमी ठेव | 5.50 | 0.60 | 3.39 | 2.71 | -50.73 |
| 17 | संचय ठेव | 0.36 | 0.79 | 0.61 | 0.54 | 50.00 |
| 18 | कॉल डिपॉझीट ठेव | 0.66 | 3.22 | 3.43 | 0.45 | -31.82 |
| 19 | कर्मचारी उत्कर्ष ठेव | 0.75 | 0.05 | 0.53 | 0.27 | -64.00 |
| | एकूण | 186.70 | 283.94 | 283.30 | 187.34 | 0.34 |

**कर्ज तपशील :-**

वित्तीय संस्थांमधील वाढत्या स्पर्धेमुळे आर्थिक व्यवहार करण्यासाठी सभासदांसमोर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने सभासद राजा आहे. परिणामी कर्जाची मागणी दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. तथापि सभासदांच्या अधिकाधिक आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने संस्थेने विविध कर्ज योजना सुरू केलेल्या आहेत. या योजनांचा लाभ बहुसंख्य सभासदांनी घेतला आहे. त्याचा तपशिल खालील तक्त्यामध्ये दिला आहे.

मागील वर्षाअखेर संस्थेकडे एकूण ₹ 177.22 कोटी कर्ज येणे शिल्लक होते. अहवाल वर्षात संस्थेने ₹74.10/- कोटी कर्ज वाटप केले. अहवाल वर्षात ₹ 69.37/- कोटी कर्ज वसूल झाले आहे. अहवाल वर्षाअखेर सभासदाकडून ₹ 181.85/- कोटी कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये येणे कर्जामध्ये 2.67% वाढ झालेली आहे.

## * कर्ज तपशील तक्ता (तुलनात्मक आकडेवारी) *

(₹. कोटीत)

| अ. क्र. | कर्जाचा प्रकार | 31 मार्च 2019 अखेर शिल्लक | अहवाल वर्षातील कर्ज वसुल | अहवाल वर्षातील कर्ज वाटप | 31 मार्च 2020 अखेर कर्ज शिल्लक | कर्जामध्ये झालेली वाढ/घट% |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | वैयक्तिक जामिनकी कर्ज | 13.41 | 5.45 | 6.49 | 14.45 | 7.76 |
| 2. | वाहन तारण कर्ज | 9.51 | 3.08 | 0.50 | 6.93 | -27.13 |
| 3. | व्यावसायिक कर्ज | 102.51 | 21.49 | 22.39 | 103.41 | 0.88 |
| 4. | गृहतारण कर्ज | 29.41 | 6.22 | 7.20 | 30.39 | 3.33 |
| 5. | तात्काळ कर्ज | 0.02 | 0.02 | 0.02 | 0.02 | 0.00 |
| 6. | इतर तारण कर्ज | 0.08 | 0.00 | 0.01 | 0.09 | 12.50 |
| 7. | दैनंदिन ठेव तारण कर्ज | 2.72 | 12.27 | 11.29 | 1.74 | -36.03 |
| 8. | सोने तारण कर्ज | 3.76 | 4.95 | 5.93 | 4.74 | 26.06 |
| 9. | कर्मचारी गृहतारण कर्ज | 3.83 | 0.71 | 0.23 | 3.35 | -12.53 |
| 10. | कर्मचारी कर्ज | 0.17 | 0.07 | 0.17 | 0.27 | 58.82 |
| 11. | कर्मचारी वाहनतारण कर्ज | 0.04 | 0.02 | 0.01 | 0.03 | -25.00 |
| 12. | दामदुप्पट ठेव कर्ज | 1.03 | 1.32 | 1.14 | 0.85 | -17.48 |
| 13. | मुदत ठेव कर्ज | 1.66 | 3.33 | 3.71 | 2.04 | 22.89 |
| 14. | लखपती ठेव कर्ज | 0.26 | 0.17 | 0.27 | 0.36 | 38.46 |
| 15. | दामतिप्पट ठेव कर्ज | 0.07 | 0.04 | 0.03 | 0.06 | -14.29 |
| 16. | दामचौपट ठेव कर्ज | 0.84 | 0.82 | 0.72 | 0.74 | -11.90 |
| 17. | दिपलक्ष्मी ठेव कर्ज | 0.95 | 1.62 | 1.66 | 0.99 | 4.21 |
| 18. | एम.आय.एस.ठेव तारण कर्ज | 2.06 | 1.99 | 2.15 | 2.22 | 7.77 |
| 19. | मंगलमुर्ती ठेव कर्ज | 0.32 | 0.70 | 0.75 | 0.37 | 15.63 |
| 20. | रिकरिंग ठेव तारण कर्ज | 0.00 | 0.01 | 0.01 | 0.00 | 0.00 |
| 21. | महालक्ष्मी ठेव कर्ज | 0.15 | 0.45 | 0.63 | 0.33 | 120.00 |
| 22. | मासिक लखपती ठेव कर्ज | 0.05 | 0.12 | 0.11 | 0.04 | -20.00 |
| 23. | वसंत पंचमी ठेव कर्ज | 0.19 | 0.31 | 0.23 | 0.11 | -42.11 |
| 24. | डिपॉझिट कॅश क्रेडिट कर्ज | 0.25 | 0.38 | 0.13 | 0.00 | -100.00 |
| 25. | महिला बचतगट कर्ज | 2.96 | 2.20 | 3.40 | 4.16 | 40.54 |
| 26. | संचय ठेव तारण कर्ज | 0.00 | 0.02 | 0.02 | 0.00 | 0.00 |
| 27. | कॅश क्रेडिट कर्ज | 0.97 | 1.59 | 2.65 | 2.03 | 109.28 |
| 28. | स्थावर मालमत्ता तारण कर्ज | 0.00 | 0.02 | 2.25 | 2.23 | 0.00 |
| | एकूण | 177.22 | 69.37 | 74.10 | 181.95 | 2.67 |

# दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

**नफा विभागणी :**

संस्थेस सन 2019-2020 या वर्षात तरतुदी व खर्च वजा जाता ₹ 2,44,34,246.63 नफा झाला असून मागील वर्षाचा शिल्लक नफा ₹ 10,055.77 मिळून एकूण ₹ 2,44,44,302.40 नफा झालेला आहे. त्याची विभागणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे. त्यास मान्यता मिळावी.

| | | |
|---|---|---|
| राखीव निधी 25% (Reserve Fund) | ₹ | 61,11,100.00 |
| लाभांश 8% (Dividend) | ₹ | 93,58,893.00 |
| इमारत निधी (Building Fund) | ₹ | 52,00,000.00 |
| धर्मादाय निधी (Charity Fund) | ₹ | 3,15,000.00 |
| शिक्षण उत्तेजनार्थ निधी (Education Dev. Fund) | ₹ | 3,00,000.00 |
| सभासद कल्याण निधी (Member Welfare Fund) | ₹ | 2,00,000.00 |
| लाभांश समिकरण निधी (Dividend Equilasation Fund) | ₹ | 2,50,000.00 |
| क्रिडा व सांस्कृतिक निधी (Sports & Activity Fund) | ₹ | 1,00,000.00 |
| सर्व हितकारी निधी ( Social Welfare Fund) | ₹ | 3,00,000.00 |
| पुढील वर्षाकरीता शिल्लक (Balance for Next Year ) | ₹ | 9,309.40 |
| बुडीत कर्ज निधी (Bad Debts) | ₹ | 23,00,000.00 |
| एकूण (TOTAL) | ₹ | 2,44,44,302.40 |

## हार्दिक अभिनंदन !

1) जम्मू काश्मिर मध्ये अतिरेकी यांनी हल्ला केला असता मोठ्या जिद्दीने केंद्र शासनाचे आय.ए.ए.एस. अधिकारी मा. श्री. श्रीधर पाटील (मु. पो. कोतोली ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर) यांनी सदर अतिरेकी हल्ल्यास योग्य प्रतिउत्तर दिले त्याबद्दल त्यांचे दत्तसेवा सहकारी पतपेढी मार्फत हार्दिक अभिनंदन!

2) कु. धीरज वसंत माईंगडे यांनी अभियांत्रिकी पदवी संपादन केलेबद्दल संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

3) दत्तसेवा परिवार संचलित दत्तसेवा विद्यालय तुरूकवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील इ. 12वीचा निकाल 91% तसेच इ. 10 वीचा निकाल 100% लागला असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

4) दत्तसेवा परिवार संचलित दत्तसेवा विद्यालय तुरूकवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील कु. श्रेया लक्ष्मण शिंदे व कु. साहिल संभाजी पाटील यांची आठवी पूर्व शिष्यवृत्ती करिता निवड झाली असून त्यांचे व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

5) संस्थेचे विभागीय अधिकारी श्री. विश्वास आकाराम माईंगडे यांची कन्या कु. दिक्षा माईंगडे यांनी इयत्ता 10 वी मध्ये 94% गुण प्राप्त करून यश संपादन केले त्याबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

संचालक मंडळ/कर्मचारी वृंद



बँको या मासिकाचा सन २०२० चा ब्ल्यू रिबीन पुरस्कार स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंदराव माईंगडे तसेच उपमुख्यव्यवस्थापिका सौ. अर्चना माईंगडे व संपादक श्री. अविनाश गुंडाळे.



३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या प्रगतीची माहिती सभासदांना देताना अध्यक्ष श्री. आनंदराव माईंगडे सोबत मा. श्री. वसंतराव शिंदे व इतर संचालक.



सन २०१८-२०१९ या सालचा प्रथम क्रमांकाचा उत्कृष्ठ शाखा चषक स्विकारताना विरार शाखेचे कर्मचारी, दैनंदिन प्रतिनिधी सोबत संस्थेचे अध्यक्ष व संचालक मंडळ.



३२ व्या वार्षिक सर्वसाधारण ... गौरव करताना संस्थेचे ... सोबत य...



ग्रामीण भागातील सभासदांना कोरोना बाबत तपासणी करता यावी या करिता शाहुवाडी तालुक्याचे तहसिलदार यांच्याकडे संस्थेच्या वतीने ५१००० चे साहित्य प्रदान करताना विभागीय अधिकारी श्री. लक्ष्मण पाटील.



सहकार, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल आदर्श फाऊंडेशन कोल्हापूर यांचे वतीने पुरस्कार स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष सोबत संस्थेचे अधिकारी, पदाधिकारी व प्रमुख पाहुणे.

# दत्तसेवा
## सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई



महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन व सहकार आयुक्त कार्यालय पुणे यांचे वतीने आयोजित कार्यक्रमामध्ये सहभागी संस्थेचे अध्यक्ष व फेडरेशनचे कार्याध्यक्ष श्री. आनंद ई. माईंगडे व पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशनचे संचालक व पदाधिकारी



कार्यक्रमाप्रसंगी खासदार मा. श्री. अरविंद सावंत यांचेशी सहकार व इतर विषयावर चर्चा करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे व सौ. अर्चना माईंगडे.



कोरोना महामारीने निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करुन संस्थेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री मा. श्री. राजेश टोपे यांना १,५१,००० चा धनादेश देताना संस्थेचे अध्यक्ष, संचालक, मुख्य वसुली अधिकारी व इतर.



सहकारी पतसंस्थासमोरील असणाऱ्या अडचणी बाबत महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष मा. श्री. काकासाहेब कोयटे यांना निवेदन देताना संस्थेचे अध्यक्ष व इतर मान्यवर.



संस्थेच्या वतीने वैद्यकिय मदतीचा धनादेश देताना संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कायदेशीर सल्लागार आणि प्रशासकीय अधिकारी.



संस्थेचा ३३ वा वर्धापन दिन प्रधान कार्यालय मालाड (प.) येथे साजरा करण्यात आला त्यावेळी सभासद व ठेवीदार यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष सोबत संस्थेचा अधिकारी वर्ग.


प्रेषक,

**दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई.**

1/136, बी.एम.सी. कॉलनी, मार्वे रोड, मालवणी,
अग्निशमन केंद्रासमोर, मालाड पश्चिम, मुंबई - 95.
दुरध्वनी : 8108160113/8108160101
Email : dattasevapatpedhi@gmail.com
Website : www.dattaseva.com


सभासद क्र. ____________ बुक-पोस्ट

प्रति,
श्री./श्रीमती ______________________________

______________________________

______________________________

युनिटी प्रिंटींग प्रेस - २३७०१९५१ / ९८२०४६०३१४ / ९८२०६१३०८५ Email : unityppnikam@gmail.com